RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष १, अंक ३१(४)] सोमवार, ऑगस्ट १७, २०१५/श्रावण २६, शके १९३७ [पृष्ठे १४, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक ४८**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

**सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.**—महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम .. .. .. पृष्ठे १-१४

दिनांक १४ ऑगस्ट २०१५ रोजी माननीय राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**नि. ज. जमादार,**
प्रभारी सचिव (विधि विधान)
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

### सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.

(मा. राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **“महाराष्ट्र शासन राजपत्रात”** दिनांक १७ ऑगस्ट २०१५ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित किंवा तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

**आणि ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यातील विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाचे व शुल्काचे विनियमन करण्यासाठी आणि त्याच्याशी संबंधित व तदानुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि म्हणून, त्यांनी दिनांक १२ मे २०१५ रोजी महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अध्यादेश, २०१५ प्रख्यापित केला होता ;

२०१५ चा महा. अध्या. ७.

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे त्यात विवक्षित गौण फेरबदल करून राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सहासष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अधिनियम, २०१५, असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, दिनांक १२ मे २०१५ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या.

**२.** या अधिनियमात संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "प्रवेश नियामक प्राधिकरण" याचा अर्थ, विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशाचे विनियमन करण्यासाठी आणि सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) घेण्यासाठी कलम ७ अन्वये घटित केलेले प्राधिकरण, असा आहे ;

(ख) "समुचित प्राधिकरण" याचा अर्थ, जे, व्यावसायिक पाठ्यक्रम किंवा शैक्षणिक विद्याशाखा यांना मान्यता देते व त्यांचे विनियमन करते असे, राज्य वा केंद्र शासनाने घोषित केलेले प्राधिकरण, असा आहे ;

(ग) "केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप)" याचा अर्थ, शैक्षणिक संस्थांमध्ये विविध व्यावसायिक पाठ्यक्रमांसाठी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याकरिता, पारदर्शक रीतीने एक खिडकी पद्धतीद्वारे सक्षम प्राधिकाऱ्याने पार पाडलेली केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया, असा आहे ;

(घ) "सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी)" याचा अर्थ, एक खिडकी पद्धतीद्वारे व्यावसायिक शिक्षण पाठ्यक्रमांना प्रवेश देण्याच्या प्रयोजनासाठी केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे उमेदवारांच्या गुणवत्तेचे निर्धारण करण्याकरिता घेण्यात आलेली प्रवेश प्रक्रिया, असा आहे ;

(ङ) "सक्षम प्राधिकारी" याचा अर्थ, खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था यांमधील प्रवेशांकरिता केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) घेण्याकरिता कलम १० अन्वये शासनाने नियुक्त केलेला, आयुक्त, राज्य सीईटी, असा आहे ;

(च) "संचालक" याचा अर्थ, ज्याच्याकडे खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेच्या पर्यवेक्षणाचे काम सोपविण्यात आले आहे असा उच्च शिक्षण किंवा तंत्रशिक्षण अथवा वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालक अथवा राज्य शासनाच्या इतर कोणत्याही संचालनालयाचा संचालक किंवा कोणत्याही आयुक्तालयाचा आयुक्त, असा आहे ;

(छ) "शुल्क" याचा अर्थ, शुल्क म्हणून निश्चित करण्यात आलेली रक्कम, असा आहे ; आणि त्यामध्ये, शिकवणी शुल्क, ग्रंथालय शुल्क, जिमखाना शुल्क, परीक्षा शुल्क, विकास शुल्क अथवा कोणत्याही अभ्यासानुवर्ती किंवा सह-अभ्यासानुवर्ती कार्यक्रमांकरिता देय असलेली रक्कम, प्रयोगशाळा शुल्क, माहिती पुस्तिका शुल्क आणि विद्यार्थ्यांकडून गोळा केलेली, अन्य कोणतीही रक्कम म्हणजेच एखाद्या खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेत एखाद्या व्यावसायिक पाठ्यक्रमाला प्रवेश दिलेल्या कोणत्याही उमेदवाराकडून, कोणत्याही प्रयोजनासाठी अशा संस्थेला देय असलेली रक्कम–मग ती कोणत्याही नावाने संबोधली जाणारी आणि कोणत्याही रीतीने स्वीकारलेली असो– यांचा समावेश होतो, परंतु त्यामध्ये, कोणत्याही वैकल्पिक वसतिगृह-निवासव्यवस्था, भोजनालय आकार आणि विद्यार्थी विमा शुल्क यांचा समावेश होणार नाही ;

(ज) "शुल्क नियामक प्राधिकरण" याचा अर्थ, विनाअनुदानित संस्थांमधील शुल्काचे निर्धारण व विनियमन करण्याकरिता कलम ११ अन्वये घटित केलेले प्राधिकरण, असा आहे ;

(झ) "विदेशी विद्यार्थी" याचा अर्थ, जो भारताचा नागरिक नाही असा विद्यार्थी, असा आहे ;

(ञ) "शासन" किंवा "राज्य शासन" याचा अर्थ, महाराष्ट्र शासन, असा आहे ;

(ट) "आनुषंगिक प्रवेश" याचा अर्थ, समुचित प्राधिकरणांच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार मंजूर पाठ्यक्रमाच्या दुसऱ्या वर्षाच्या जागांवरील विद्यार्थ्यांचा प्रवेश, असा आहे ;

(ठ) "व्यवस्थापन" याचा अर्थ, खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेचा कारभार जिच्याकडे सोपविला असेल अशी, त्या संस्थेची व्यवस्थापन समिती किंवा नियामक मंडळ- मग ते कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो- असा आहे, आणि जेथे असा कारभार कोणत्याही व्यक्तीकडे सोपविला असेल-मग ती कोणत्याही नावाने अथवा पदनामाने संबोधण्यात येवो–तेथे, त्यामध्ये अशा कोणत्याही व्यक्तीचा समावेश होतो ;

(ड) "अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था" याचा अर्थ, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३० च्या खंड (१) अन्वये तसे करण्याचा अधिकार असणाऱ्या महाराष्ट्र राज्यामध्ये अधिवासी असलेल्या अल्पसंख्याक समाजातील व्यक्तींनी त्यांच्याकरिता स्थापन केलेली व प्रशासन केलेली, राज्य शासनाने अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था म्हणून अधिसूचित केलेली खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था, असा आहे ;

१९६१ चा ४३. (ढ) "अनिवासी भारतीय (एनआरआय)" याचा अर्थ, आयकर अधिनियम, १९६१ याच्या कलम ६ च्या पोट-कलम (६) अन्वये "सर्वसाधारणपणे रहिवासी नसलेली" व्यक्ती, असा आहे, आणि त्यामध्ये
१९९९ चा ४२. विदेशी चलन व्यवस्थापन अधिनियम, १९९९ याच्या कलम २ च्या खंड (ब) अन्वये भारताबाहेर निवास करणाऱ्या व्यक्तीचा समावेश होतो आणि तसेच त्यामध्ये तिच्या बालकाचा वा पाल्याचाही समावेश होतो ;

(ण) "भारतीय वंशाची व्यक्ती (पीआयओ)" याचा अर्थ, जी व्यक्ती भारताव्यतिरिक्त अन्य देशाची नागरिक आहे, परंतु, जी कोणत्याही वेळी भारताची नागरिक होती ; किंवा जिच्या मातापित्यांपैकी किंवा
१९५५ चा ५७. आजी-आजोबांपैकी कोणीही एक, भारताच्या संविधानाच्या भाग दोनच्या तरतुदींनुसार अथवा नागरिकत्व अधिनियम, १९५५ अन्वये भारताची नागरिक होती, अशी कोणतीही व्यक्ती, असा आहे ;

(त) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(थ) "खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था" याचा अर्थ, समुचित प्राधिकरणाने मंजुरी किंवा मान्यता दिलेल्या कोणत्याही व्यावसायिक पाठ्यक्रमाचे किंवा पाठ्यक्रमांचे संचालन करणारे आणि कोणत्याही विद्यापीठाशी संलग्न असलेले कोणतेही महाविद्यालय, शाळा, संस्था, परिसंस्था किंवा इतर निकाय-मग तो कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो-असा आहे, परंतु त्यामध्ये,—

(एक) केंद्र सरकार, कोणतेही राज्य शासन किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकरण यांनी स्थापन, व्यवस्थापन किंवा प्रशासन केलेली अशी कोणतीही संस्था ;

१९५६ चा ३. (दोन) विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ याच्या कलम ३ अन्वये अभिमत विद्यापीठ म्हणून घोषित केलेली संस्था ; किंवा

(तीन) विद्यापीठ अनुदान आयोग (खाजगी विद्यापीठाची स्थापना व परिरक्षण) विनियम, २००३ यांच्या तरतुदी लागू असलेले कोणतेही विद्यापीठ,—

यांचा समावेश होणार नाही ;

(द) "व्यावसायिक शिक्षण" याचा अर्थ, शासनाने वेळोवेळी व्यावसायिक शिक्षण म्हणून घोषित व अधिसूचित केलेला कोणताही शैक्षणिक पाठ्यक्रम, असा असून त्यामध्ये, कोणत्याही नावाने संबोधला जाणारा व समुचित प्राधिकरणाने मान्यता दिलेला, पदवीपूर्व किंवा पदव्युत्तर पदवी, पदविका देणारा पाठ्यक्रम यांचा समावेश होतो ;

(ध) "नफेखोरी" याचा अर्थ, या अधिनियमाच्या तरतुदींनुसार मान्य केलेल्या शुल्कापेक्षा अधिक असेल अशी, प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे रोख वा वस्तूच्या स्वरूपात स्वीकारलेली कोणतीही रक्कम, असा आहे ;

(न) "विनियमन" याचा अर्थ, नियामक प्राधिकरणांनी केलेले विनियम, असा आहे ;

(प) "नियामक प्राधिकरण" याचा अर्थ, कलम ७ खालील प्रवेश नियामक प्राधिकरण किंवा, यथास्थिति, कलम ११ खालील शुल्क नियामक प्राधिकरण, असा आहे ;

(फ) "मंजूर प्रवेशक्षमता" याचा अर्थ, समुचित प्राधिकरणाने एखाद्या खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेशाच्या समुचित स्तरावर प्रत्येक व्यवसायिक पाठ्यक्रमाला किंवा विद्याशाखेत एकाच शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांना प्रवेश देण्याकरिता मंजूर किंवा मान्य केलेल्या एकूण जागा, असा आहे ;

(ब) "हितसंबंधित घटक" याचा अर्थ, व्यवस्थापन, संबंधित संस्थेमध्ये शिकणारे विद्यार्थी आणि त्यांचे पालक, असा आहे ;

(भ) "विनाअनुदानित संस्था" याचा अर्थ, जिला केंद्र सरकारचे, राज्य शासनाचे किंवा स्थानिक प्राधिकरणाचे सहाय्य किंवा सहायक अनुदान मिळत नाही अशी खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था, असा आहे ;

(म) "विद्यापीठ" यास, विद्यापीठ अनुदान आयोग अधिनियम, १९५६ याच्या कलम २ च्या खंड (च) मध्ये त्यास जो अर्थ नेमून दिलेला असेल तोच अर्थ असेल. १९५६ चा ३.

प्रकरण दोन

## प्रवेशाचे विनियमन

प्रवेशासाठी पात्रता.

**३.** (१) कोणत्याही खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेमधील व्यावसायिक पाठ्यक्रमाच्या प्रवेशासाठी असलेल्या पात्रतेच्या शर्ती व आवश्यकता, शासनाकडून वेळोवेळी अधिसूचित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील, परंतु, त्या समुचित प्राधिकरणाकडून विनिर्दिष्ट करण्यात येतील त्यापेक्षा कमी नसतील.

(२) कोणत्याही विद्यार्थ्याने, अधिसूचित करण्यात येईल अशी शैक्षणिक किंवा तत्सम अर्हता धारण केली असल्याखेरीज, त्याला खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश देण्यात येणार नाही.

(३) विहित करण्यात येईल अशा प्रक्रियेद्वारे विद्यार्थ्यांना विनाअनुदानित संस्थेमध्ये प्रवेश देण्यात येईल.

प्रवेशाची रीत.

**४.** प्रत्येक विनाअनुदानित संस्थेमधील व्यावसायिक पाठ्यक्रमासाठीच्या जागांचे प्रवेश पुढील रीतीने पार पाडण्यात येतील :—

(क) शासनाने वेळोवेळी घोषित केलेला संस्थात्मक कोटा वगळता, खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेमधील जागांवरील प्रवेश, नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने घेण्यात आलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेची (सीईटी) कार्यपद्धती अनुसरून, गुणवत्तेच्या आधारावर देण्यात येतील :

परंतु, संस्थात्मक कोट्यातील प्रवेश हा गुणवत्तेच्या आधारे आणि समुचित प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेली कार्यपद्धती अनुसरल्यानंतरच देण्यात येईल :

परंतु आणखी असे की, राज्य शासन वेळोवेळी आदेश काढून कोणत्याही व्यावसायिक पाठ्यक्रमांना त्याच्याशी संबंधित सामाईक प्रवेश परीक्षेच्या (सीईटी) आवश्यकतेमधून सूट देईल ;

(ख) अशा संस्थेतील प्रवेश सक्षम प्राधिकरणाकडून, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत सामायिक प्रवेश परीक्षेच्या (सीईटी) आधारे आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेच्या (कॅप) आधारे पार पाडण्यात येतील ;

(ग) प्रवेश प्रक्रिया योग्य, पारदर्शी, गुणवत्तेवर आधारित व शोषणरहित असल्याची सुनिश्चिती करण्याच्या हेतूने, सक्षम प्राधिकारी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा पद्धतीने संपूर्ण केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे पर्यवेक्षण करील व त्याबाबत मार्गदर्शन करील.

नियमबाह्य प्रवेश रद्दबातल ठरणे.

**५.** या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करून दिलेला कोणताही प्रवेश हा, रद्दबातल ठरेल.

**६.** (१) अल्पसंख्याक शैक्षणिक संस्था वगळता, विनाअनुदानित संस्थांमधील वेगवेगळ्या प्रवर्गांखालील जागांचे वाटप हे, महाराष्ट्र खाजगी व्यावसायिक शिक्षण संस्था (अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, निरधिसूचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती आणि इतर मागासवर्ग यांना प्रवेश देण्यासाठी जागांचे आरक्षण) अधिनियम, २००६ यानुसार आणि अनिवासी भारतीयांचा कोटा यांसह, वेळोवेळी जाहीर करण्यात आलेल्या शासनाच्या धोरणानुसार करण्यात येईल ; जागांचे वाटप व आरक्षण. २००६ चा महा. ३०.

(२) एखाद्या विनाअनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेतील प्रवेश हे, राज्य शासनाच्या धोरणानुसार देण्यात येतील आणि मंजूर प्रवेश क्षमतेच्या एकावन्न टक्क्यांपेक्षा कमी नसतील इतक्या जागांवरील प्रवेश हे, ती संस्था ज्या अल्पसंख्याक समाजाची असेल अशा, राज्यातील अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांमधून सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) यांमधील परस्पर गुणवत्तेच्या आधारे देण्यात येतील :

परंतु, एखाद्या विनाअनुदानित अल्पसंख्याक शैक्षणिक संस्थेतील अल्पसंख्याक प्रवर्गासाठी राखून ठेवलेली कोणतीही जागा, एखाद्या शैक्षणिक वर्षात भरावयाची राहून गेल्यास किंवा निवडीनंतर विद्यार्थी ती संस्था सोडून गेल्यास त्या बाबतीत, न भरलेल्या रिक्त जागा, कलम १० च्या पोट-कलम (४) च्या तरतुदींना अनुसरून घेतलेली सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) यांमधील परस्पर गुणवत्ता यादीच्या आधारे, ज्या अल्पसंख्याक प्रवर्गाची ती संस्था असेल त्या अल्पसंख्याक प्रवर्गामधून भरण्यासाठी राज्य शासनाच्या सक्षम प्राधिकाऱ्याकडे परत करण्यात येतील :

परंतु आणखी असे की, त्यानंतरदेखील त्या जागा भरल्या गेल्या नाहीत तर, अशा भरल्या न गेलेल्या जागा, सक्षम प्राधिकाऱ्याने घेतलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेतील (सीईटी) आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया (कॅप) यांमधील गुणवत्तेच्या आधारे, सर्वसाधारण प्रवर्गामधील विद्यार्थ्यांमधून भरण्यात येतील :

परंतु तसेच, जर अशा संस्थेने लागोपाठच्या तीन वर्षांच्या कालावधीत तिच्या मंजूर प्रवेशक्षमतेच्या किमान एकावन्न टक्के प्रवेश संबंधित अल्पसंख्याक प्रवर्गातील व्यक्तींमधून देण्यात कसूर केली तर, सक्षम प्राधिकारी, राष्ट्रीय अल्पसंख्याक शिक्षण संस्था आयोग अधिनियम, २००४ याच्या कलम १२ग अन्वये कारवाई करण्यासाठी अशा संस्थेची माहिती राज्य शासनाला देईल. २००५ चा २.

प्रकरण तीन

## प्रवेश नियामक प्राधिकरण आणि राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष

**७.** (१) या अधिनियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी, "प्रवेश नियामक प्राधिकरण" म्हणून ओळखले जाणारे एक प्राधिकरण असेल. प्रवेश नियामक प्राधिकरणाची रचना व त्याची कार्ये.

(२) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पोट-कलम (१) अन्वये प्राधिकरण घटित करता येईल. उक्त प्राधिकरण हे, उपरोक्त नावाचे एक निगम निकाय असेल, त्यास अखंड परंपरा व सामायिक मोहोर असेल आणि त्यास जंगम व स्थावर अशा दोन्ही प्रकारची मालमत्ता संपादन करण्याचा, ती धारण करण्याचा व तिचा विनियोग करण्याचा आणि या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी करण्याचा अधिकार असेल आणि त्याच्याविरुद्ध किंवा त्याच्या नावाने दावा दाखल करता येईल.

(३) प्राधिकरण हे पुढील व्यक्तींचे मिळून बनलेले असेल,—

| | | |
|---|---|---|
| (क) | उच्च न्यायालयाचा सेवानिवृत्त न्यायाधीश किंवा शासनाचा मुख्य सचिव दर्जाचा सेवानिवृत्त अधिकारी | ... अध्यक्ष |
| (ख) | विद्यापीठाचा कुलगुरू म्हणून काम केले असेल असा ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ | ... सदस्य |
| (ग) | व्यावसायिक शिक्षण क्षेत्रामधील एक नामांकित तज्ज्ञ | ... सदस्य |
| (घ) | कुल सचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | ... सदस्य |
| (ङ) | संचालक, तंत्र शिक्षण | ... सदस्य |
| (च) | संचालक, उच्च शिक्षण | ... सदस्य |
| (छ) | महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद याचा सदस्य-सचिव | ... सदस्य |
| (ज) | आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परीक्षा | ... सचिव. |

(४) पोट-कलम (३) च्या खंड (क), (ख) आणि (ग) खालील अध्यक्षाची आणि सदस्यांची नियुक्ती, राज्य शासनाकडून करण्यात येईल.

(५) अनुदानित किंवा विनाअनुदानित व्यावसायिक शैक्षणिक संस्थेशी संबंधित असणारी कोणतीही व्यक्ती, प्रवेश नियामक प्राधिकरणाची सदस्य होण्यास पात्र असणार नाही.

(६) राज्य शासनाच्या मते, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या एखाद्या सदस्याचे कोणतेही कृत्य अशोभनीय असेल तर, तो, प्राधिकरणाचा सदस्य असण्याचे बंद होईल.

(७) अध्यक्ष हा, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या बैठकींचे अध्यक्षपद भूषवील आणि प्राधिकरणाला, त्यास योग्य वाटेल अशी, विनियमांद्वारे आपली स्वतःची कार्यपद्धती अनुसरता येईल.

(८) प्रवेश नियामक प्राधिकरणाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, केवळ त्याचे कोणतेही पद रिक्त असल्याच्या किंवा त्याच्या रचनेत कोणताही दोष असल्याच्या कारणावरून अवैध असल्याचे मानण्यात येणार नाही.

प्रवेश नियामक प्राधिकरणाचे अध्यक्ष व सदस्य यांचा पदावधी व त्यांच्या सेवाशर्ती.

**८.** (१) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या अध्यक्षाचा व सदस्यांचा पदावधी हा, त्यांच्या नामनिर्देशनाच्या दिनांकापासून पाच वर्षे इतका असेल आणि कोणत्याही कारणामुळे अगोदरच पद रिक्त होईल त्या बाबतीत, असे रिक्त पद उर्वरित कालावधीसाठी भरण्यात येईल.

(२) प्रवेश नियामक प्राधिकरणाचे अध्यक्ष व सदस्य हे, पुनर्नियुक्तीसाठी पात्र असणार नाहीत.

(३) अध्यक्षास किंवा सदस्यास, शासनाला उद्देशून पदाचा लेखी राजीनामा देता येईल आणि असा राजीनामा स्वीकारण्यात आल्यावर, त्याचे पद रिक्त होईल आणि असे रिक्त पद, ते रिक्त झाल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत भरण्यात येईल.

(४) शासनाच्या मते प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या अध्यक्षाचे किंवा सदस्याचे कोणतेही कृत्य अशोभनीय असेल तर, अशा प्राधिकरणाच्या अध्यक्षाला किंवा सदस्याला पदावरून दूर करता येईल. अशाप्रकारे दूर करण्यात आलेला अध्यक्ष किंवा सदस्य, अशा प्राधिकरणावर पुनर्नियुक्तीस पात्र असणार नाही :

परंतु, अशा अध्यक्षास किंवा सदस्यास, आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज प्रवेश नियामक प्राधिकरणावरून दूर करता येणार नाही.

(५) प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या अध्यक्षाला व सदस्यांना द्यावयाचे वेतन व भत्ते हे, शासनाकडून वेळोवेळी, एकतर भविष्यलक्षी किंवा भूतलक्षी प्रभावाने, अधिसूचित करण्यात येईल, त्याप्रमाणे असतील.

(६) जर एखादी व्यक्ती,—

(एक) कोणत्याही विनाअनुदानित संस्थेत कोणतेही पद, पदनाम धारण करीत असेल किंवा तिच्याशी ती कोणत्याही रीतीने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे संबंधित किंवा सहयोगी असेल ;

(दोन) तिला शासनाच्या मते, नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असलेल्या अपराधाबद्दल दोषी ठरविण्यात आले असेल आणि तिला कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली असेल ;

(तीन) ती अविमुक्त नादार असेल ;

(चार) ती विकल मनाची असेल आणि सक्षम न्यायालयाने तिला तसे घोषित केले असेल ;

(पाच) शासनाच्या किंवा शासनाची मालकी किंवा नियंत्रण असलेल्या निगम निकायाच्या सेवेतून तिला काढून टाकण्यात आले असेल किंवा बडतर्फ करण्यात आले असेल ;

(सहा) शासनाच्या मते, असा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून आपली कार्ये किंवा कर्तव्ये पार पाडल्याने बाधक परिणाम होण्याची शक्यता असेल, असे आर्थिक किंवा इतर हितसंबंध तिने धारण केले असतील ; किंवा

(सात) विहित करण्यात येईल अशी अन्य अनर्हता तिने धारण केली असेल ;

तर अशा कोणत्याही व्यक्तीस प्रवेश नियामक प्राधिकरणाचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नियुक्त केली जाण्यास अनर्ह ठरविण्यात येईल.

(७) अध्यक्ष व सदस्यांच्या सेवेच्या इतर अटी व शर्ती ह्या, विहित करण्यात येईल त्याप्रमाणे असतील.

प्रवेश नियामक प्राधिकरणाचे कार्ये, अधिकार व कार्यपद्धती.

**९.** (१) प्रवेश नियामक प्राधिकरणाची कार्ये पुढीलप्रमाणे असतील,—

(एक) या अधिनियमान्वये स्थापन केलेल्या सीईटी कक्षामार्फत सीईटीचे संचालन व संनियंत्रण करणे ;

(दोन) प्रवेश प्रस्तावांची पडताळणी करणे व त्यांना अंतिमतः मान्यता देणे ;

(तीन) या अधिनियमाच्या तरतुदींच्या विरुद्ध प्रवेश दिल्याचे आढळून आल्यास, तो प्रवेश रद्द करणे ;

(चार) हितसंबंधित घटकांच्या तक्रारींचे निवारण करणे.

(२) प्रवेश नियामक प्राधिकरणास, या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी, पुढील अधिकार असतील :—

(एक) विनाअनुदानित संस्थांमधील विद्यार्थ्यांच्या प्रवेशांशी संबंधित हितसंबंधित घटकांमधील विवादांवर अभिनिर्णय करणे ;

(दोन) प्राधिकरणाला योग्य वाटेल त्याप्रमाणे प्रवेश प्रस्तावांची छाननी आणि तक्रार निवारण यंत्रणेसंबंधी आपली कार्यपद्धती विहित करणे ;

(तीन) विनाअनुदानित संस्थांची प्रवेश प्रक्रिया ही अनुचित, अपारदर्शक व शोषण करणारी आहे आणि म्हणून, प्राधिकरणाच्या निर्णयामुळे प्रतिकूल परिणाम होण्याची शक्यता असलेल्या व्यक्तींना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, ती प्रवेश प्रक्रिया अवैध असल्याचे घोषित करणे ;

(चार) या अधिनियमाचे उल्लंघन करून दिलेल्या प्रवेशाबद्दल त्या संस्थेची संलग्नता किंवा मान्यता काढून घेण्यासाठी संबंधित संलग्न विद्यापीठाला, मंडळाला किंवा अशा अन्य प्राधिकरणाला शिफारस करणे.

(३) पोट-कलमे (१) व (२) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास अस्तित्वात असलेली प्रवेश नियंत्रण समिती ही, या अधिनियमाखालील प्रवेश नियामक प्राधिकरण यथोचितरीत्या घटित करण्यात येईतोपर्यंत अशा प्राधिकरणाच्या अधिकारांचा वापर करण्याचे चालू ठेवील.

(४) या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडताना, आणि या अधिनियमान्वये कोणतीही चौकशी करण्याच्या प्रयोजनार्थ प्रवेश नियामक प्राधिकरणास पुढील बाबींसंबंधात दाव्याची न्यायचौकशी करताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाला असलेले सर्व अधिकार असतील,—

१९०८ चा ५.

(एक) कोणत्याही साक्षीदाराला समन्स पाठविणे आणि त्याला हजर राहण्यास भाग पाडणे आणि त्याची शपथेवर तपासणी करणे ;

(दोन) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेणे व तो सादर करणे ;

(तीन) शपथपत्रांवर पुरावा स्वीकारणे ;

(चार) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढणे.

(५) या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडताना, प्राधिकरण व प्रत्येक विनाअनुदानित संस्था पुढील कार्यपद्धती अनुसरील :—

(एक) प्रत्येक विनाअनुदानित संस्था, प्रवेशाच्या अंतिम दिनांकापासून १५ दिवसांच्या आत, संबंधित संचालनालयाला 'प्रवेश मंजुरीचे प्रस्ताव' सादर करील ;

(दोन) प्रत्येक संस्था, संबंधित संचालनालयाने प्रमाणित केलेले असे प्रस्ताव, अशा प्रमाणनाच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या कालमर्यादेच्या आत प्रवेश नियामक प्राधिकरणाला सादर करील ;

(तीन) प्रवेश नियामक प्राधिकरण, संस्थांकडून मिळालेल्या अशा प्रत्येक प्रस्तावाची प्रत्येक वर्षाच्या ३१ जानेवारी पूर्वी छाननी करील आणि त्यांना मान्यता देईल ;

(चार) प्रवेशासंबंधीची कोणतीही तक्रार प्राधिकरणासमोर दाखल करता येईल व पंधरा दिवसांच्या आत व प्रवेशाच्या अंतिम दिनांकापूर्वी त्यावर निर्णय घेण्यात येईल ;

(पाच) प्रवेश नियामक प्राधिकरणास त्याबाबतची कारणे नमूद करून, आपल्या स्वतःच्या आदेशाचे पुनर्विलोकन करण्याचा अधिकार असेल ;

(सहा) प्रवेश नियामक प्राधिकरणाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, केवळ त्यात कोणतेही पद रिक्त असल्याच्या किंवा त्याच्या रचनेत कोणताही दोष असल्याच्या कारणामुळे अवैध असल्याचे मानण्यात येणार नाही ;

(सात) प्रवेश नियामक प्राधिकरण, विनियमनांद्वारे, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, प्रवेश प्रस्तावांची छाननी व तक्रार निवारण यंत्रणेसंबंधीची आपली कार्यपद्धती विहित करील.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष व त्याची कार्ये.

**१०.** (१) एक राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष असेल.

(२) राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या प्रमुखपदी, राज्य सीईटीचा आयुक्त म्हणून नामनिर्देशित केलेला, सह सचिवाच्या दर्जापेक्षा कमी नसेल अशा दर्जाचा, प्रवेश नियामक प्राधिकरणाच्या नियंत्रणाखालील एक अधिकारी असेल.

(३) आयुक्तास, वैद्यकीय, तंत्र, कृषि, उच्च शिक्षण, इत्यादी क्षेत्रांतील राज्य शासनाच्या सह संचालकाच्या दर्जाचे अधिकारी सहाय्य करतील.

(४) विनाअनुदानित संस्थेमधील प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षा सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत घेण्यात येईल :

परंतु, राज्य शासनास, केंद्र सरकारच्या प्राधिकरणाद्वारे घेण्यात आलेल्या सामाईक प्रवेश परीक्षेमार्फत (सीईटी) दिल्या जाणाऱ्या अशा प्रवेशाला मान्यता देता देईल.

(५) कक्षास, विहित करण्यात येतील असे अधिकार असतील आणि तो कक्ष विहित करण्यात येईल अशा रीतीने अशी कार्ये पार पाडील आणि परीक्षा आयोजित करील.

(६) कक्ष, सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) आवश्यक ती गोपनीयता राखून, उचित रीतीने आयोजित करण्याच्या संबंधात सर्व निर्णय घेईल. तो कक्ष, परीक्षक, मूल्यमापक, नियामक यांची नियुक्ती करील आणि परीक्षांचे आयोजन, मूल्यमापन व निकालाची प्रक्रिया यांसाठी आवश्यक ते सॉफ्टवेअर विकसित करण्याच्या कामगिरीसाठी व्यक्तींची नियुक्ती करील आणि तसेच ऑनलाईन किंवा ऑफलाईन परीक्षा आयोजित करण्यासाठी आवश्यक त्या सेवा पुरवठादारांची नियुक्ती करील आणि विविध दस्तऐवज, इत्यादींची छपाई करील. सामाईक प्रवेश परीक्षा घेण्याशी संबंधित सर्व कामकाजाची अंमलबजावणी करण्यासाठी वित्तीय अधिकारांचा वापर करील.

(७) संस्थात्मक कोटा वगळून प्रत्येक जागेवरील प्रवेश हा, राज्याच्या आरक्षण धोरणास अधीन राहून, केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे अनुसरण्यात आलेल्या सामाईक परीक्षेमध्ये संपादित केलेल्या गुणवत्तेच्या आधारे देण्यात येईल :

परंतु, २०१५-२०१६ या शैक्षणिक वर्षाकरिता घेण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेस या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

## प्रकरण चार

## **शुल्काचे विनियमन**

शुल्क नियामक प्राधिकरण.

**११.** (१) या अधिनियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी व नेमून दिलेली कार्ये पार पाडण्यासाठी शुल्क नियामक प्राधिकरण म्हणून ओळखले जाणारे एक प्राधिकरण असेल.

(२) राज्य शासनास, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पोट-कलम (१) अन्वये प्राधिकरण घटित करता येईल. उक्त प्राधिकरण हे, उपरोक्त नावाचा एक निगम निकाय असेल, त्यास अखंड परंपरा व सामाईक मोहोर असेल आणि त्यास जंगम व स्थावर अशा दोन्हीही प्रकारच्या मालमत्ता संपादित करण्याचा, ती धारण करण्याचा आणि तिचा विनियोग करण्याचा आणि या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी आवश्यक त्या सर्व गोष्टी करण्याचा अधिकार असेल आणि त्याच्या विरुद्ध किंवा त्याच्या नावाने दावा दाखल करता येईल.

(३) प्राधिकरण हे पुढील व्यक्तींचे मिळून बनलेले असेल,—

| | | | |
|---|---|---|---|
| (क) | उच्च न्यायालयाचा सेवानिवृत्त न्यायाधीश किंवा शासनाचा मुख्य सचिव दर्जाचा सेवानिवृत्त अधिकारी | ... | अध्यक्ष |
| (ख) | विद्यापीठाचा कुलगुरू म्हणून काम केले असेल असा ख्यातनाम शिक्षणतज्ज्ञ | ... | सदस्य |
| (ग) | दहा वर्षांहून कमी नसेल इतक्या कालावधीसाठी भारतीय सनदी लेखापाल संस्थेचा सदस्य असेल असा नामांकित सनदी लेखापाल | ... | सदस्य |

| | | | |
|---|---|---|---|
| (घ) | दहा वर्षांहून कमी नसेल इतक्या कालावधीसाठी भारतीय व्यय आणि परिव्यय लेखा संस्थेचा सदस्य असलेला असा नामांकित परिव्यय लेखापाल किंवा प्रख्यात अर्थतज्ञ | ... | सदस्य |
| (ङ) | व्यावसायिक शिक्षण क्षेत्रातील नामांकित तज्ञ | ... | सदस्य |
| (च) | कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक | ... | सदस्य |
| (छ) | संचालक, तंत्र शिक्षण | ... | सदस्य |
| (ज) | संचालक, उच्च शिक्षण | ... | सदस्य |
| (झ) | महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद याचा सदस्य-सचिव | ... | सदस्य |
| (ञ) | सह सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल असा राज्य शासनाचा अधिकारी | .... | सचिव. |

(४) पोट-कलम (३) च्या खंड (क), (ख), (ग), (घ) व (ङ) खालील अध्यक्षाची व सदस्यांची नियुक्ती शासनाकडून करण्यात येईल.

(५) कोणत्याही खाजगी अनुदानित किंवा विनाअनुदानित व्यावसायिक शैक्षणिक संस्थेशी सहयोगी असलेली कोणतीही व्यक्ती, शुल्क नियामक प्राधिकरणाची सदस्य होण्यास पात्र असणार नाही.

(६) राज्य शासनाच्या मते, शुल्क नियामक प्राधिकरणाच्या एखाद्या सदस्याचे कोणतेही कृत्य अशोभनीय असेल तर, तो प्राधिकरणाचा सदस्य असण्याचे बंद होईल.

(७) अध्यक्ष हा, शुल्क नियामक प्राधिकरणाच्या बैठकीचे अध्यक्षपद भूषवील आणि प्राधिकरणाला, त्यास योग्य वाटेल अशी विनियमांद्वारे आपली स्वतःची कार्यपद्धती अनुसरता येईल.

(८) शुल्क नियामक प्राधिकरणाची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, केवळ त्यात कोणतेही रिक्त पद असल्याच्या किंवा त्याच्या रचनेत कोणताही दोष असल्याच्या कारणामुळे अवैध असल्याचे मानले जाणार नाही.

शुल्क नियामक प्राधिकरणाचा अध्यक्ष व सदस्य यांचा पदावधी व त्यांच्या सेवाशर्ती.

**१२.** शुल्क नियामक प्राधिकरणाचा अध्यक्ष व सदस्य यांच्या पदावधीच्या व सेवाशर्तीच्या बाबतीत कलम ८ च्या तरतुदी, योग्य त्या फेरफारांसह लागू असतील.

शुल्क नियामक प्राधिकरणाची कार्ये, अधिकार व कार्यपद्धती.

**१३.** (१) शुल्क नियामक प्राधिकरण, पुढील कार्ये पार पाडील :—

(एक) कलम १५ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या घटकांच्या आधारे, विनाअनुदानित संस्थांनी आकारलेल्या शुल्काचे वाजवीपण निर्धारित करणे ; आणि महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (कॅपिटेशन फी घेण्यास प्रतिबंध) अधिनियम, १९८७ याच्या कलम २ च्या खंड (अ) च्या अर्थांतर्गत अशा रीतीने आकारलेले शुल्क हे, नफेखोरी किंवा कॅपिटेशन शुल्क आकारणी म्हणून समजले जाणार नाही किंवा कसे याची पडताळणी करणे ;

१९८८ चा महा. ६.

(दोन) विनाअनुदानित संस्थांच्या शुल्काच्या प्रस्तावांची छाननी व पडताळणी करणे आणि त्यांना अंतिमतः मान्यता देणे ;

(तीन) पायाभूत सोयी व सुविधा यांच्या पडताळणीसाठी यंत्रणा विकसित करणे आणि अशा सोयी व सुविधा यांची पडताळणी करणे ;

(चार) संबंधित समुचित प्राधिकरणाच्या अनिवार्य मार्गदर्शक तत्त्वांनुसार विनाअनुदानित संस्थांसाठी, प्रति विद्यार्थ्यामागे करावयाचा व्यावसायिक पाठ्यक्रमनिहाय आवश्यक तो खर्च निर्धारित करण्यासाठी, शुल्क नियामक प्राधिकरणास योग्य वाटेल अशा कालांतराने, संशोधन अभ्यास हाती घेणे ; आणि

(पाच) हितसंबंधित घटकांच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी उपाय योजणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये, आपली कार्ये पार पाडताना, शुल्क नियामक प्राधिकरणास, पुढील अधिकार असतील :—

(एक) शुल्कविषयक प्रस्तावांची छाननी व पडताळणी करणे व त्यांना अंतिमतः मान्यता देणे ;

(दोन) विनाअनुदानित संस्थांमधील पायाभूत सोयी, सुविधा यांची पडताळणी करण्यासाठी यंत्रणा विकसित करणे व अशा सोयी व सुविधा यांची पडताळणी करणे ;

(तीन) हितसंबंधित घटकांच्या तक्रारींचे निवारण करणे.

(३) पोट-कलमे (१) आणि (२) यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास अस्तित्वात असलेली शुल्क नियंत्रण समिती ही, या अधिनियमाखालील शुल्क नियामक प्राधिकरण यथोचितरित्या घटित करण्यात येईतोपर्यंत अशा प्राधिकरणाच्या अधिकारांचा वापर करण्याचे चालू ठेवील.

(४) शुल्क नियामक प्राधिकरणास, त्याची कार्ये पार पाडण्यासाठी आणि या अधिनियमाखालील कोणतीही चौकशी करण्याच्या प्रयोजनार्थ, त्याला पुढील बाबींसंबंधातील दाव्याची न्यायचौकशी करताना, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाला असलेले सर्व अधिकार असतील :— १९०८ चा ५.

(एक) कोणत्याही साक्षीदाराला समन्स पाठवून उपस्थित राहण्यास भाग पाडणे आणि त्याची शपथेवर तपासणी करणे ;

(दोन) कोणत्याही दस्तऐवजाचा शोध घेणे व तो सादर करणे ;

(तीन) शपथपत्रांवर पुरावा स्वीकारणे ;

(चार) साक्षीदारांच्या तपासणीसाठी आयोगपत्र काढणे.

(५) शुल्क नियामक प्राधिकरणास, विद्यार्थ्यांकडून वसूल केलेल्या शुल्काच्या तुलनेत विनाअनुदानित संस्थांना पुरविलेल्या पायाभूत सोयी व सुविधांची पडताळणी करण्याकरिता अधिकाऱ्यांची चौकशी समिती नेमता येईल.

शुल्क नियामक प्राधिकरणाने अनुसरावयाची कार्यपद्धती.

**१४.** (१) शुल्क संरचनेचा वाजवीपणा निर्धारित करताना, पुढील तरतुदी लागू असतील :—

(क) विनाअनुदानित संस्थेचे व्यवस्थापन, मागील वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षित लेखे, चालू वित्तीय वर्षाच्या संबंधातील प्रस्तावित अर्थसंकल्प आणि संबद्ध अभिलेख व पुरावे यांसह प्रस्तावित शुल्काचा तपशील, शुल्क नियामक प्राधिकरणाकडे, आधीच्या शैक्षणिक वर्षाच्या ३१ ऑक्टोबरच्या आत, त्याच्या मान्यतेसाठी सादर करील ;

(ख) प्राधिकरणाने विनिर्दिष्ट केलेल्या कालमर्यादेत शुल्क नियामक प्राधिकरणाकडे शुल्कामध्ये वाढ करण्याच्या सुधारणेसाठीचा प्रस्ताव सादर केला नसेल त्यावेळी, प्राधिकरणाने मान्यता दिलेली आणि मागील शैक्षणिक वर्षामध्ये लागू असलेली शुल्क संरचना पुढे लागू राहील ;

(ग) शुल्क नियामक प्राधिकरण, सादर केलेल्या प्रस्तावांची छाननी करण्याकरिता एक स्वतंत्र छाननी कक्ष स्थापन करील ;

(घ) सर्व संबंधित घटकांचा विचार केल्यानंतर, शुल्क नियामक प्राधिकरण, प्रस्तावित शुल्काचा तपशील प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून एकशेवीस दिवसांच्या कालावधीच्या आत शुल्काला मान्यता देईल आणि अशाप्रकारे मान्यता दिलेल्या शुल्काचा तपशील कळवील ;

(ङ) जर शुल्क नियामक प्राधिकरणाने मान्यता दिलेले शुल्क, विनाअनुदानित संस्थेला स्वीकार्य नसेल तर, त्या संस्थेस, शुल्काचा तपशील कळविल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत, शुल्क नियामक प्राधिकरणाकडे, त्याच्या निर्णयाच्या पुनर्विलोकनासाठी सविस्तर कारणांसह पुनर्विलोकन अर्ज सादर करता येईल. प्रत्येक वर्षाच्या ३१ मार्चपूर्वी अशा पुनर्विलोकन अर्जावर निर्णय घेणे शुल्क नियामक प्राधिकरणास बंधनकारक असेल आणि त्यानुसार शुल्क नियामक प्राधिकरण संबंधित संस्थेला त्याचा निर्णय कळवील ;

(च) शुल्क नियामक प्राधिकरणास, त्यास योग्य वाटेल अशी, शुल्कविषयक प्रस्तावांची छाननी आणि तक्रार निवारण यंत्रणेसंबंधीची आपली कार्यपद्धती विहित करता येईल.

(२) शुल्क नियामक प्राधिकरणाच्या निर्णयाच्या अधीन राहून, व्यवस्थापनास, शुल्क नियामक प्राधिकरणाकडून विशिष्ट शैक्षणिक वर्षाचे अंतिम निर्धारण करण्यात येईपर्यंत, अंतरिम किंवा, यथास्थिति, तदर्थ शुल्क गोळा करण्याचे स्वातंत्र्य असेल.

(३) शुल्क नियामक प्राधिकरण, ज्या शीर्षाखाली शुल्क आकारले जाईल अशी विविध शीर्षे नमूद करील.

(४) प्रत्येक विनाअनुदानित संस्था, नियामक प्राधिकरणाने मान्यता दिलेले पाठ्यक्रमनिहाय शुल्क आपल्या सूचना फलकावर आणि आपल्या संकेतस्थळावर मराठी व इंग्रजीमध्ये प्रदर्शित करील. परंतु, भाषिक अल्पसंख्याक संस्थांच्या बाबतीत, अशी संस्था ज्या अल्पसंख्याक भाषेशी संबंधित असेल त्या अल्पसंख्याक भाषेतही ते शुल्क प्रदर्शित करील आणि ते विद्यार्थी व संस्था यांच्यावर बंधनकारक असेल.

(५) कोणतीही संस्था, एखाद्या विद्यार्थ्यांकडून एका शैक्षणिक वर्षात एका वर्षाच्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क वसूल करणार नाही आणि एखाद्या शैक्षणिक वर्षात एका वर्षापेक्षा अधिक वसूल केलेले शुल्क हे, कॅपिटेशन फी असल्याचा अर्थ लावण्यात येईल आणि अशी संस्था तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास पात्र असेल.

(६) शुल्क नियामक प्राधिकरणाने मान्य केलेले व कळविलेले शुल्क, त्या शैक्षणिक वर्षात त्या विना-अनुदानित संस्थेत प्रवेश घेणाऱ्या उमेदवाराच्या बाबतीत लागू असेल आणि त्यात, संबंधित संस्थेतील अशा विद्यार्थ्याचा पाठ्यक्रम पूर्ण होईपर्यंत सुधारणा करण्यात येणार नाही :

परंतु, विनाअनुदानित संस्थेस, शुल्क नियामक प्राधिकरणाच्या पूर्व मान्यतेने, करांमधील सुधारणा, नियमित खर्चामधील अचानक फेरबदल, इत्यादी कारणास्तव, दुसऱ्या किंवा नंतरच्या वर्षांच्या शुल्कामध्ये सुधारणा करता येईल.

शुल्क संरचनेचे निर्धारण करण्यासाठीचे घटक.

**१५.** शुल्क नियामक प्राधिकरण, पुढील घटक विचारात घेऊन, प्रत्येक व्यावसायिक पाठ्यक्रम किंवा पाठ्यक्रमांच्या गटाच्या संबंधात प्रत्येक विनाअनुदानित संस्थेने प्रस्तावित केलेल्या शुल्क संरचनेचा वाजवीपणा निर्धारित करील,—

(एक) संस्थेचे ठिकाण (नागरी किंवा ग्रामीण) ;

(दोन) जमिनीची व इमारतीची किंमत ;

(तीन) समुचित प्राधिकरणाकडून विनिर्दिष्ट करण्यात येईल त्याप्रमाणे, आवश्यक त्या किमान अनिवार्य पायाभूत सोयी किंवा सुविधा ;

(चार) समुचित प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार अनिवार्य नसलेल्या सुविधा व सोयी यांवरील प्रस्तावित खर्च किंवा केलेला खर्च ;

(पाच) समुचित प्राधिकरणाच्या विहित प्रमाणकांनुसार नियमितरीत्या नियुक्त केलेल्या अर्हताप्राप्त शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्गाची उपलब्ध संख्या ;

(सहा) शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्गाच्या विहित वेतनांवरील खर्च ;

(सात) प्रशासन व परिरक्षण यांवरील खर्च ;

(आठ) संस्थेकडून चालविण्यात येणाऱ्या व्यावसायिक पाठ्यक्रमाच्या विशेष संदर्भासह त्या संस्थेची वृद्धी व विकास यासाठी आवश्यक असलेला अतिरिक्त पर्याप्त असा महसूल, जो संबंधित व्यावसायिक पाठ्यक्रमाच्या किंवा पाठ्यक्रमांच्या गटाच्या शैक्षणिक महसुलाच्या पंधरा टक्क्यांपेक्षा अधिक नसेल ;

(नऊ) व्यावसायिक पाठ्यक्रम चालविण्यासाठी, शासनाकडून पुरविण्यात आलेल्या सोयीसुविधा जसे सवलतीच्या दराने जमीन भाडेपट्ट्याने देणे आणि त्याच्या पायाभूत सुविधांचा वापर करणे ;

(दहा) मत्ता स्थानांतरण घसारा किंवा अंशदान निधी ;

(अकरा) इमारतीचे भाडे किंवा वापर आकार ;

(बारा) गुणवत्तावाढीसाठीची प्रोत्साहने, जसे,—

(क) पीएचडी अर्हता यासह विद्याशाखीय पदव्या व त्या संस्थेची आंतरराष्ट्रीय जर्नलमधील संशोधन प्रकाशने आणि दाखल केलेले पेटंट ;

(ख) विद्यार्थ्यांचे विद्याशाखीय प्रशिक्षण आणि त्यांचे सेवायोजन ;

(ग) पात्र कार्यक्रमांची किंवा संस्थेची अधिस्वीकृती जसे, एनबीए, एनएबीईटी, नॅक, इत्यादी ;

(तेरा) चलनवाढीचा दर ;

(चौदा) शुल्क नियामक प्राधिकरणाकडून निर्धारित करण्यात येईल असा, इतर कोणताही संबंधित घटक.

नियामक प्राधिकरणांचा निधी.

**१६.** (१) प्रत्येक नियामक प्राधिकरणाचा एक स्वतंत्र निधी असेल.

(२) उक्त प्राधिकरणांच्या निधींमध्ये पुढील रकमांचा समावेश असेल :—

(एक) खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्थेकडून देय असलेले प्रक्रिया शुल्क ;

(दोन) ठेवींवरील व्याज ;

(तीन) राज्य शासन, केंद्र सरकार आणि विद्यापीठ अनुदान आयोग व इतर संस्था यांच्याकडून मिळणारी अनुदाने (कोणतीही असल्यास).

(३) नियामक प्राधिकरणांना, सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) घेण्यासाठी प्रक्रिया शुल्क आणि उक्त प्राधिकरणांकडून वेळोवेळी ठरवण्यात येईल असे शुल्क निश्चिती इत्यादी आकार आकारता येईल. प्रत्येक वर्षाचे प्रक्रिया शुल्क संबंधित प्राधिकरणांकडून, वेतन, भत्ते, प्रशासकीय खर्च, मानधन, पायाभूत गरजा आणि त्यांच्या कार्याच्या अनुषंगाने इतर कोणतीही कामे इत्यादींसह, त्यांचा दैनंदिन खर्च विचारात घेऊन, ठरवण्यात येईल.

(४) संबंधित प्राधिकरणे, राष्ट्रीयीकृत बँकेत स्वतंत्र बँक खाते उघडतील आणि त्यातील जमा रकमांमधून आपला खर्च भागवतील.

## प्रकरण पाच

## **प्राधिकरणांचे लेखे आणि अभिलेख्यांचे परिरक्षण.**

लेखे ठेवणे.

**१७.** नियामक प्राधिकरणे, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आपले संबंधित लेखे ठेवतील.

लेखापरीक्षा.

**१८.** नियामक प्राधिकरणांच्या लेख्यांची, भारताचा नियंत्रक व महालेखापरीक्षकाकडून प्रत्येक वर्षी लेखापरीक्षा करण्यात येईल आणि त्याचा अहवाल, त्याच्या लगतनंतर भरविण्यात येणाऱ्या अधिवेशनात राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवण्यात येईल.

नियामक प्राधिकरणांच्या कार्याचा अहवाल.

**१९.** नियामक प्राधिकरणे, आधीच्या वित्तीय वर्षातील कामांच्या संबंधातील आपला वार्षिक अहवाल विहित करण्यात येईल अशा नमुन्यात आणि अशा मुदतीत, राज्य शासनाला सादर करतील आणि राज्य शासन, असा अहवाल त्याच्या लगतनंतर भरविण्यात येणाऱ्या अधिवेशनात राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांपुढे ठेवण्याची व्यवस्था करील.

## प्रकरण सहा

## **शास्ती.**

शास्ती.

**२०.** (१) कोणत्याही व्यक्तीने, या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केले आहे असे, जर नियामक प्राधिकरणाचे मत झाले असेल तर त्यास, अशा व्यक्तीला,—

(क) पहिल्या वेळच्या उल्लंघनाबद्दल, एक लाख रुपयांहून कमी नसेल परंतु, पाच लाख रुपयांपर्यंत असू शकेल एवढी किंवा या अधिनियमान्वये निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक घेतलेल्या रकमेच्या दुप्पट रकमेएवढी, यापैकी जी अधिक असेल, एवढी शास्ती भरण्याचे ;

(ख) दुसऱ्या किंवा नंतरच्या उल्लंघनाबद्दल, दोन लाख रुपयांहून कमी नसेल परंतु, दहा लाख रुपयांपर्यंत असू शकेल एवढी किंवा या अधिनियमान्वये निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा अधिक घेतलेल्या रकमेच्या दुप्पट रकमेएवढी, यापैकी जी अधिक असेल, एवढी शास्ती भरण्याचे ;

निदेश देता येतील.

(२) जो कोणी, प्राधिकरणांना चुकीची माहिती, खोटे व बनावट लेखापुस्तके, कपटपूर्ण दस्तऐवज, आणि त्यासारखा असा इतर पुरावा, इत्यादी देईल तर,—मग ते कृत्य फायद्यासाठी किंवा लाभासाठी केलेले असो किंवा नसो,— त्याने अपराध केला असल्याचे समजले जाईल आणि तो अपराधसिद्धीनंतर सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाच्या शिक्षेस पात्र ठरेल.

(३) पोट-कलम (२) खालील अपराध दखलपात्र असेल.

(४) या कलमान्वये चौकशी सुरू असतानाच्या कालावधीत, प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या शुल्कापेक्षा अधिक शुल्क विनाअनुदानित संस्थेने आकारल्याचे आढळून आल्यास, असे शुल्क संबंधित विद्यार्थ्याला परत करण्यात येईल.

(५) वारंवार उल्लंघन किंवा अनियमितता झाल्यास, संबंधित प्राधिकरणाकडे, अशा संस्थेच्या नावाची संलग्नता किंवा मान्यता काढून घेण्यासाठी शिफारस करण्यात येईल.

(६) जेव्हा या अधिनियमाखालील किंवा त्याखाली केलेल्या नियमांखालील अपराध किंवा अनियमितता व्यवस्थापनाने केली असेल त्याबाबतीत, असा अपराध किंवा अनियमितता घडली त्यावेळी जिच्याकडे, व्यवस्थापनाचे कामकाज चालविण्यासाठी त्याचप्रमाणे व्यवस्थापनासाठी व्यवस्थापनाचा प्रभार होता आणि जी व्यवस्थापनाचे कामकाज चालविण्यास व्यवस्थापनास जबाबदार होती आणि त्या प्रयोजनासाठी व्यवस्थापनाने त्यांच्यामधून नामनिर्दिष्ट केलेली अशी प्रत्येक व्यक्ती, तसेच ते व्यवस्थापनदेखील अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कारवाई करण्यात येईल व त्यानुसार त्याला शिक्षा करण्यात येईल :

परंतु, अपराध तिच्या नकळत घडला होता आणि असा अपराध घडू नये म्हणून तिने योग्य ती तत्परता दाखविली होती असे सिद्ध केल्यास, अशी कोणतीही व्यक्ती, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(७) पोट-कलम (६) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, जेव्हा या अधिनियमाखालील किंवा त्याखाली केलेल्या नियमांखालील एखादा अपराध एखाद्या व्यवस्थापनाने केला असेल, आणि तो अपराध व्यवस्थापनाचा कोणताही पदाधिकारी, अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या संमतीने किंवा त्याने कानाडोळा केल्यामुळे किंवा त्याने दुर्लक्ष केल्यामुळे घडला आहे असे सिद्ध झाल्यास, असा कोणताही पदाधिकारी, संबंधित अधिकारी किंवा कर्मचारी त्या अपराधाबद्दल दोषी असल्याचे मानण्यात येईल व त्याच्याविरुद्ध कारवाई केली जाण्यास व त्यानुसार शिक्षा दिली जाण्यास तो पात्र असेल.

## प्रकरण सात

## संकीर्ण

**२१.** या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या आणि विनियमांच्या तरतुदींनुसार सद्भावनापूर्वक केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल कोणत्याही प्राधिकरणाविरुद्ध किंवा प्राधिकरणांच्या कार्यालयात कार्यरत असणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल केली जाणार नाही.

सदभावनेने केलेल्या कृतीस संरक्षण.

**२२.** राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी किंवा त्यात किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांमध्ये किंवा आदेशांमध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही तरतुदी अंमलात आणण्यासाठी, त्याच्या मते आवश्यक किंवा इष्ट असतील असे या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींशी सुसंगत असलेले सर्वसाधारण किंवा विशेष निदेश प्राधिकरणांना देता येतील.

राज्य शासनाचा निदेश देण्याचा अधिकार.

नियम करण्याचा अधिकार.

**२३.** (१) राज्य शासनास, या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील.

(२) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनांत मिळून एकूण तीस दिवसांचा होईल इतक्या कालावधीसाठी, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल, आणि ज्या अधिवेशनात तो अशा रीतीने ठेवण्यात आला असेल ते अधिवेशन किंवा त्याच्या लगतनंतरचे अधिवेशन किंवा अधिवेशने समाप्त होण्यापूर्वी कोणत्याही नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे सहमत होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये म्हणून दोन्हीही सभागृहे सहमत होतील आणि तशा आशयाचा आपला निर्णय, **राजपत्रात** अधिसूचित करतील तर, तो नियम, असा निर्णय **राजपत्रात** प्रसिद्ध केल्याच्या दिनांकापासून, केवळ अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा, यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

विनियम करण्याचा अधिकार.

**२४.** नियामक प्राधिकरणांना, या अधिनियमाखालील आपली कार्ये पार पाडण्यासाठी, या अधिनियमाच्या आणि त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसलेले विनियम करता येतील.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**२५.** (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुरूप, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनांसाठी, त्याला आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, **राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा कोणताही आदेश काढण्यात येणार नाही.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

सन २०१५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ याचे निरसन व व्यावृत्ती.

**२६.** (१) महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) अध्यादेश, २०१५ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २०१५ चा महा. अध्या. ७.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.